# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (School Council)

बैठक क्र. 48

दि.28.10.2017

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 48 , दि.28.10.2017 रोजी सकाळी 11.30 ते 5.00 या वेळेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील संगणक हॉल, शैक्षणिक इमारत- येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

1. डॉ. विजया पाटील – अध्यक्ष, प्र.संचालक,शिक्षणशास्त्र विद्याशाखा
2. डॉ. कविता साळुंके—सदस्य व सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद
3. डॉ. चंद्रकांत बोरसे —सदस्य, प्राचार्य, म.वि.प्र.चे बी.एड. कॉलेज, नासिक
4. डॉ. अरुण जवळेकर -- सदस्य, प्राचार्य, चेंबुर बी.एड. कॉलेज, चेंबूर, मुंबई
5. डॉ. हेमंत राजगुरु – सदस्य, प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
6. डॉ. संजिवनी महाले—सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
7. प्रा. विजयकुमार पाईकराव —सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
8. डॉ. सुभाष सोनूने —सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
9. डॉ. शिवानंद कहाळेकर—निमंत्रित सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
10. डॉ. ज्ञानेश्वर जाधव — निमंत्रित सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
11. श्री. कैलास मोरे, — निमंत्रित सदस्य, कलेक्टर ऑफिस, नासिक

बैठकीस खालील सदस्य त्यांच्या वैयक्तीक अडचणींमुळे उपस्तित राहू शकले नाही.

- प्रा.डॉ. एस.व्ही. चौधरी – सदस्य, इंदिरा गांधी नँशनल ओपन युनिव्हर्सिटी, न्यु दिल्ली
- प्रा.डॉ. आर.बी. मानेकर-- सदस्य, अकोला
- प्रा.डॉ. उर्मिला धूत -- सदस्य, परभणी
- प्रा. माधव पळशीकर, -- सदस्य, प्र.संचालक,संगणकशास्त्र विद्याशाखा
- प्रा. डॉ. जयदिप निकम -- सदस्य, प्र.संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा
- प्रा. डॉ. सुरेश पाटील -- सदस्य, मुल्यमापन केंद्र

**48.1. विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2017/ 01-02**

दिनांक 7 एप्रिल 2017 रोजी झालेल्या 47 व्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त आणि कार्यवृत्तास मान्यता देणेबाबत... ( सहपत्र क्र.1 व 2 )

**निर्णय :** 7 एप्रिल 2017 रोजी झालेल्या 47 व्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक इतिवृत्त व कार्यवृत्तास मान्यता देण्यात आली.

**48.2. . विषय क्र. बी.-2 / एफ-175 / 2017/ 3.1**

**बी.एड. शिक्षणक्रम विषयनिहाय पूर्नेरचित पाठ्यक्रम व लेखक समिती मान्यतेबाबत...**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेने एन.सी.टी.ई ने 2014 मध्ये प्रसिध्द केलेल्या अभ्यासक्रम चौकटीनूसार बी.एड. शिक्षणक्रम पूर्नेरचनेचे कार्य हाती घेतले आहे. त्यातील पुढील नऊ विषयांसंदर्भात पाठ्यक्रम विकसन समित्यांच्या बैठका सप्टेंबर महिन्यात आयोजित करण्यात आल्या होत्या, त्या बैठकांमध्ये तयार केलेला पाठ्यक्रम व विषय निहाय लेखक याद्या मान्यतेसाठी सदर.

<u>अनिवार्य विषय पाठ्यक्रम</u>

1. समकालीन भारतीय समाज आणि शिक्षण
2. लिंग, शाळा आणि समाज
3. अभ्यासक्रम आणि भाषा
4. ज्ञान आणि अभ्यासक्रम

<u>क्षेत्रिय कार्य विषय पाठ्यक्रम</u>

1. कला व नाट्य
2. आंतरवासिता
3. महिती संप्रेषण तंत्रविज्ञानाचे उपयोजन
4. वाचन आणि विमर्षण
5. स्वशोध

**निर्णय :** बी.एड. पूर्नरचित शिक्षणक्रम समाविष्ट उपरोक्त नऊ विषयांचे सहपत्र 3 मधील पाठ्यक्रमांना मान्यता देण्यात आली. तसेच सहपत्र 4 मध्ये विषय निहाय दिलेल्या लेखक समितीनांही मान्यता देण्यात आली. आणि सदर विषयांची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

**48.3.2. विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.2**

**बी.एड. शिक्षणक्रम प्रवेश व संपर्कसत्र पूर्नरचित शेड्युल बाबत...**

बी.एड. पुर्नरचित शिक्षणक्रमात बी.एड. एफ.वाय.व बी.एड. एस.वाय. असे दोन स्वतंत्र वर्षे करुन प्रत्येक वर्षी पाच सैद्धांतिक विषय आहेत. त्यांची अंतिम परिक्षा ही त्या त्या वर्षी घेण्यात येते. त्यामुळे पाच विषयांचे संमंत्रण

व प्रात्यक्षिक कार्ये केवळ एका दिवाळी संपर्कसत्रात पूर्ण करणे केंद्राना अशक्य होते. म्हणून या शिक्षणक्रमाचे प्रवेश व संपकसत्र शेड्युल पुढीलप्रमाणे करण्याचा विचार आहे.

- जानेवारी – जाहिरात
- मार्च/एप्रिल- प्रत्यक्ष प्रवेश
- एप्रिल - संचालक समन्वयक बैठक व प्रवेश याद्या वाटप

**प्रथम वर्ष - 35 दिवस संपर्कसत्र**

- मे- प्रथम संपर्कसत्र 22 दिवस
- आक्टो-नोव्हे-- द्वितीय संपर्कसत्र 12 दिवस
- डिसेंबर --3 दिवस कोचिंग (तृतीय सत्र)

**द्वितीय वर्षे- 35 दिवस संपर्कसत्र**

- मे-चतुर्थ संपर्कसत्र 22 दिवस
- ऑगस्ट -पाचवे संपर्कसत्र 2 दिवस (पाठ)
- ऑक्टो/ नोव्हे- सहावे संपर्कसत्र 09 दिवस
- जानेवारी / फेब्रुवारी-- 2 दिवस (मौ.परीक्षा)

असे एकूण 70 दिवसांचे संपर्कसत्र असतील. मात्र यासाठी बी.एड. प्रवेश प्रक्रिया कालावधी जाने ते मार्च असा असणे अनिवार्य असेल.)

**निर्णय :** सदर निर्णय केंद्रावरच्या प्रश्नांची उत्तरे देणारा तसेच कार्यवाहीसाठी अत्यंत महत्वाचा ठरणार असल्याचे मत व्यक्त करुन जानेवारी मध्ये जाहिरात व मे मध्ये प्रथम संपर्कसत्र आयोजन या दृष्टिने उपरोक्त बी.एड. प्रवेश व संपर्कसत्र शेड्युलच्या नियोजनास मान्यता देण्यात आली. आणि सदर विषयांची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

48. 3.3 **विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.3**

**बी.एड. शिक्षणक्रम शुल्क वाढीबाबत...**

बी.एड. शिक्षणक्रमातील संपर्कसत्राचा कालावधी पूर्वी 54 दिवस + 16 दिवस समंत्रणे असा 70 दिवस होता. आताही तो 70 दिवसच असेल. परंतु समंत्रणांच्या तासिकांमध्ये वाढ होणार असल्याने बी.एड. अभ्यासकेंद्राचे मानधनामध्ये वाढ करणे अपेक्षित आहे. सध्या बी.एड. शिक्षणक्रम शुल्क रु. 35,000/- आहे. त्यात 5% दरवर्षी वाढ याप्रमाणे साधारणत: रु. 2000/- + 2100/- समंत्रण मानधन वाढ असे एकूण 4000/- रु. वाढ करावी

म्हणजे 2018-20 बी.एड. तुकडीसाठी 39000/- शुल्क करावे. दरवर्षीप्रमाणे 50% विद्यापीठ व 5 अभ्यासकेंद्र याप्रमाणे त्याची विभागणी होऊन प्रवेशाचे वेळी विद्यापीठ शुल्क विद्यापीठात स्विकार अभ्यासकेंद्रावर अभ्यासकेंद्र शुल्क घेण्यात यावे असे वाटते.

**निर्णय :** उपरोक्त विषयावर चर्चा होऊन बी.एड. शिक्षणक्रम शुल्क रु. 39,000/- ( रुपये एकोण चाळीस हजार फक्त) करण्यास मान्यता देऊन दरवर्षीप्रमाणे 50% अभ्यासकेंद्र व 50% विद्यापिठ हिस्सा प्रवेशाचे वेळी जमा करुन उर्वरीत 50%अभ्यासकेंद्रावर भरण्यास मान्यता देण्यात आली. आणि सदर विषय विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

**48.3.4. विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.4**

**बी.एड. शिक्षणक्रमातील काही विषयांना केवळ ग्रेड देणे बाबत....**

बी.एड. शिक्षणक्रमात योगा व पर्यावरण शिक्षण हे दोन विषय अनिवार्य करण्यात आले आहेत. ह्या दोन्ही विषयांचा भर प्रात्यक्षिकांवर असल्याने त्यांची अंतिम लेखी परिक्षा न होता प्रथम वर्षी योगा व द्वितीय वर्षी पर्यावरण शिक्षण या दोन्ही विषयांसाठी केवळ प्रात्यक्षिकांचे अंतर्गत मुल्यमापन ठेऊन अभ्यासकेंद्राकडून ग्रेड मागवावी व त्या ग्रेड चा गुणपत्रकात उल्लेख करावा असे वाटते.

**निर्णय :** उपरोक्त विषयावर चर्चा होऊन बी.एड. प्रथम वर्षाला योगा व द्वितीय वर्षाला पर्यावरण शिक्षण हे विषय ठेऊन त्याना केवळ अभ्यासकेंद्राकडून प्राप्त श्रेणी देण्यास मान्यता देण्यात आली. सदर विषय विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

**48.3.5. विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.5**

**बी.एड. शिक्षणक्रमासाठी पालघर जिल्ह्यात एक अभ्यासकेंद्र सुरु करणेबाबत.. (सहपत्र क्र. 5 )**

NCTE ने बी.एड. साठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयास एक याप्रमाणे 35 जिल्ह्यांना 35 अभ्यासकेंद्र य.च.म.मुक्त विद्यापीठाला दिली आहेत. पालघर जिल्हा नव्याने निर्माण झाल्यानंतर या जिल्ह्यासाठी स्वतंत्र अभ्यासकेंद्र असावे अशी पालघर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची मागणी आहे. त्यासंदर्भात NCTE शी पत्रव्यवहार केला आहे. अद्याप उत्तर अप्राप्त आहे. (पालघर जिल्ह्यात उपलब्ध असणारी दोन बी.एड. कॉलेजेसचे पत्ते सहपत्र 5 मध्ये जोडले आहे.)

**निर्णय :** 2018-20 तुकडीपासून पालघर साठी स्वतंत्र अभ्यासकेंद्र देणेबाबत चर्चा होऊन सहपत्र 5 मधील दोन्ही बी.एड. महाविद्यालयांचे परिक्षण (Inspection) करुन एक अभ्यासकेंद्र बी.एड. साठी निश्चित करावे असा निर्णय घेण्यात आला. आणि सदर विषयाची मान्यतेसाठी विद्वत परिषदेकडे शिफारस करण्यात आला.

48.3.6 विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.6

**एम.ए. शिक्षणशास्त्र या शिक्षणक्रमातील संशोधन अहवाल पुर्नसादरीकरण शुल्काबाबत..**

एम. ए. (शिक्षणशास्त्र) ह्या शिक्षणक्रमाचे संशोधन अहवाल, परीक्षण आणि मौखिक परीक्षेनंतर केंद्राकडून विद्यापीठाकडे पाठविण्यात येतात. विद्यापीठात त्या अहवालांचे परिशीलन करण्यात येते. हया परिशिलनात प्रबंध असमाधानकारक असल्यास नाकारण्यात येतात. नाकारलेले प्रबंध परत अभ्यासकेंद्रावर पाठविण्यात येतात. ते अहवाल अभ्यासकेंद्रावर पुर्नसादरीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात यावे असे वाटते.

| क्र. | शुल्कशिर्ष | शुल्क रक्कम |
|---|---|---|
| 1 | विद्यापीठ शुल्क | रु. 500/- |
| 2 | संशोधन मार्गदर्शन मानधन (त्या त्यावर्षाच्या मानधनाच्या 40%) | रु. 200/- |
| 3 | अंतर्गत व बहिस्थ परीक्षक | रु.250/- |
| 4 | आयोजन खर्च | रु. 400/- |
| 5 | एकूण | रु.1350/- |

निर्णय : एम. ए. (शिक्षणशास्त्र) ह्या शिक्षणकमाचे संशोधन अहवाल पूर्नसादरीकरण शुल्क रु. 1350/ -ला (विद्यापीठ शुल्क रु. 500/- अभ्यासकेंद्र शुल्क रु.850/-) उपरोक्त विभाजनासह मान्यता देण्यात आली आणि सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

48.3.7. विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.7

**E-32 (मूल्यशिक्षण) या शिक्षणक्रमाचे नावात तसेच त्यातील विषयांचे नाव व कोड मध्ये बदल करणेबाबत...सहपत्र क्र. 6**

E-32 या शिक्षणक्रमाची पथदर्शी तुकडी नुकतीच पासआऊट झाली आहे. परंतु या शिक्षणक्रमाच्या संरचनेत पुढील बदल आवश्यक आहेत. त्यास मा. कुलगुरुंची मान्यता घेण्यात आली आहे. सहपत्र क्र.6

| शिर्ष | पूर्वीचे | अपेक्षित बदल |
|---|---|---|
| प्रोग्राम नांव | Certificate Programme in Value Education | Certificate Programme in Value Education : Fundamentals |
| कोर्स कोड व नांव | EDU 187 Natures, Beauty and Transformation | EDU 187- Beauty knowledge, transition |
| कोर्सकोड व नांव | EDU 188 Moral Capabilities | EDU 188 Moral Capabilities, Fundamentals. |

**निर्णय :** सहपत्र 6 नूसार E-32 या शिक्षणक्रमाचे नावामध्ये आणि विषयाच्या कोडमध्ये बदलास उप टेबलनूसार मान्यता देण्यात आली. सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

**48.3.8 विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.8**

**घर कामगार कौशल्ये प्रमाणपत्र शिक्षणक्रम आयोजनाबाबतील नियमांबाबत..( परिशिष्ट-7 )**

मा. कुलगुरुच्या आदेशान्वये घरकामगार कौशल्ये पदविका शिक्षणक्रमाचे प्रमाणपत्र शिक्षणक्रमात रुपांतर करण्याचे कार्य पूर्ण झाले आहे. या शिक्षणक्रमाच्या आयोजनाबाबतचे नियम परिशिष्ट 7 मध्ये जोडले आहे.

**निर्णय :** उपरोक्त विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यात लिहिता वाचता येणाऱ्या घरकामगारांना या शिक्षणक्रमास प्रवेश आणि मोबाईल संमंत्रण व्यवस्था करावी . या सूचनांसह परिशिष्ठ क्र.7 मध्ये दिलेल्या या शिक्षणक्रमाच्या आयोजनाबाबतच्या नियमांना मान्यता देण्यात आली. सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

**48.3.9. विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.9**

**ग्राम रोजगार सेवक कौशल्ये प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणेबाबत..**

नाशिक विभागीय मनरेगा रोहयो उपयुक्त कार्यालय यांचे कार्यालयातून प्राप्त झाले. महात्मा गांधी ग्राम रोजगार योजना सेवक या अंतर्गत महाराष्ट्रातील प्रत्येक गावात एक ते तीन संख्येने सेवक नियुक्त करण्यात येतात. त्यांना शासन मानधन देते. त्या सेवकांचा कौशल्य विकास करण्याच्या दृष्टीने उपरोक्त शिक्षणक्रम विकसित करावा असे वाटते.

**निर्णय :** उपरोक्त विषयावर निमंत्रित सदस्य श्री. मोरे यांनी महाराष्ट्रात 28,749 ग्रामपंचायती आहेत. एका गावावर 70 लाख रु. खर्च करता येतो. गावातील मजुराला गावातच रोजगार मिळण्याची व्यवस्था पण आहे. वंचित घटकाला केंद्रीभूत ठेवून ही योजना आहे . या संदर्भात कायदा पण तयार करण्यात आला आहे. ई-मास्टर ऑनलाईन रेकॉर्ड, ऑनलाईन आराखडा इ. संदर्भात या सेवकांना प्रशिक्षण देण्यासाठी हा शिक्षणक्रम महत्वाचा ठरेल असे स्पष्ट केले.

तत्वत: या शिक्षणक्रमाला सर्व तज्ज्ञांनी मान्यता दिली मात्र तो कोणत्या विद्याशाखेत असावा या बाबत दोन मतप्रवाह होते ते पुढीलप्रमाणे :

1. सदर शिक्षणक्रम हा पब्लिक अँडमिनिस्ट्रेशनशी संबधित असल्याने मानव्यविद्या आणि सामाजिकशास्त्र विद्याशाखेतून त्याची कार्यवाही व्हावी असे सुचविण्यात आले.
2. सदर शिक्षणक्रम शिक्षणशास्त्र विद्याशाखेत सुरु करावा. मं.गांधींचे तत्वज्ञान, मुलोद्योगी शिक्षण इ. विषयांशी संबधित हा शिक्षणक्रम आहे.

वरील मतमतांतरानंतर असे ठरविण्यात आले की शिक्षणक्रम सुरु करण्यास मान्यता आहे, मात्र तो शिक्षणक्रम कोणत्या विद्याशाखेअंतर्गत असावा ह्या बाबतचा निर्णय विद्वत परिषदेमार्फत घेण्यात यावा. त्यानंतर सदर विषयाची पुढील कार्यवाहीसाठी विद्वत परिषदेत शिफारस करण्यात यावी.

**48.3.10 विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.10**

**स्त्रियांचे सबलीकरण व कौशल्य विकास- प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणेबाबत —(परिशिष्ट-4)**

भारतीय विद्या संशोधन केंद्र धुळे, यांचेकडून स्त्रियांच्या सर्वांगिण विकासाबरोबरच छोट्या गृहउद्योगांचे प्रशिक्षण देण्यासाठी स्त्रियांचे सबलीकरण व कौशल्य विकास हा शिक्षणक्रम सुरु केला आहे. तो शिक्षणक्रम विद्यापीठाने कार्यान्वित करावा व त्याचे प्रायोगिक अभ्यासकेंद्र भारतीय विद्या संशोधन केंद्राला द्यावे यासाठी त्यांनी एक पत्र पाठविले आहे. ते परिशिष्ट 8 मध्ये जोडले आहे.

**निर्णय** : शिक्षणशास्त्र विद्याशाखेमध्येच स्त्रीयांचे सबलीकरणासाठी स्वयं सहाय्य गटबांधणी प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु आहे. तेव्हा स्वतंत्र नविन प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसित न करता पूर्वीच्या शिक्षणक्रमामध्ये उपरोक्त विषयाचे एक मॉड्युल गरजेनूसार समाविष्ट करण्यात यावे,असा निर्णय घेण्यात आला.आणि सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात यावी .

48.3.11 विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.11

**Post Graduate Diploma in e-Education in Digital Society (PGDEEDs) शिक्षणक्रम संरचनेतील बदलास मान्यता मिळणेबाबत...**

(PGDEEDs) शिक्षणक्रमाच्या संरचनेस यापूर्वी विद्वत्त परिषदेने मान्यता दिलेली आहे. यु.जी.सी. मार्गदर्शक तत्वे आणि विद्यापीठाचे धोरणात्मक नियम यामुळे त्यात पुढील चार बदल करण्यात आले आहेत.

1. संरचना बदल

| क्र. | शिर्ष | पूर्वी | नविन |
|---|---|---|---|
| 1 | शिक्षणक्रम श्रेयांक | 60 | 64 |
| 2 | विषय | 07 | 13 |
| 3 | प्रकल्प | 01 | 03 |
| 4 | गुण | 1200 | 1600 |

2. विद्यापीठ शुल्क एकूण रु. 6000/- चे विभाजन

| परीक्षा शुल्क रु. | शेक्षणिक शुल्क रु. | नोंदणी शुल्क रु. | इतर रु. | विकसन शुल्क रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1200/- | 2400/- | 100/- | 300/- | 2000/- | 6000/- |

3. मुल्यमापन योजना—

| मुल्यमापन शिर्ष | भारांश |
|---|---|
| प्रात्यक्षिक कार्य मुल्यमापन | अंतर्गत 60% |
| संशोधन प्रकल्प, क्षेत्रीय कार्य- | अंतर्गत 50% अंतिम 50% |
| मौखिक परीक्षा — | अंतिम 20% |
| e-पोर्ट फोलिओ | अंतिम 20% |

एकूण मुल्यमापन

- अभ्यासक्रम 60 % अंतर्गत व 40% अंतिम
- संशोधन कार्य - 50 % अंतर्गत व 50% अंतिम

4. निकष

- प्रति अभ्यासक्रम किमान 40 %
- संशोधन कार्य किमान 40 %
- एकूण शिक्षणक्रम किमान 40%

5. श्रेणी आणि गुण रुपांतरण

यु.जी.सी. मार्गदर्शक तत्वानूसार श्रेणी आणि गुण रुपांतरण तक्ता तयार करण्यात आला आहे. तो तसेच संपूर्ण शिक्षणक्रम कार्यवाही योजना परिशिष्ट क्र.9 मध्ये जोडला आहे.

निर्णय : उपरोक्त विषयावर चर्चा करुन या शिक्षणक्रमाचा संरचना बदल, मुल्यमापन योजना व निकष आणि श्रेणी व गुण रुपांतरण या बदलांना मान्यता , विद्यापीठ शुल्क व विभाजन या बाबत विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानूसार शुल्क बदलांचे निर्णय घ्यावे असे सुचविण्यात आले. व परिशिष्ट क्र.9 ला मान्यता देण्यात आली. सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

48.3.12 विषय क्र.बी.-1 / एफ-175 / 2017/ 3.12

ऐनवेळचे विषय

1. बी.एड. शिक्षणक्रम प्रवेश जागांबाबत...

निर्णय :

प्रत्येक जिल्ह्याला ठराविक जागा असतात. त्यात प्रवेश अर्जाअभावी जागा रिक्त राहिल्यास त्या जागा त्या त्या जिल्ह्याच्या रिजन मधील उर्वरीत जिल्ह्यात समान वाटप करुन अतिरीक्त भरण्यास मान्यता देण्यात आली. मात्र या परिस्थितीत संबधित केंद्रावर 50 पेक्षा जास्त जागा होणार नाहीत याची काळजी घेण्याचे सूचित करुन सदर विषय विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

2. **मूल्यमापन व प्राश्निक याद्यांबाबत..**

**निर्णय :** परीक्षा विभागातून शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांसाठी दिलेल्या सहपत्र 10 मधील प्राश्निक याद्यांना मान्यता देण्यात आली. व सदर विषयाची विद्वतपरिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

3. **एम.फिल. शिक्षणक्रम सुरु करण्यास मान्यता देणेबाबत...**

**निर्णय :** यु.जी.सी. ने 13 आक्टो.2017 रोजी आपल्या विद्यापीठाला पी.एच.डी. आणि एम.फिल. हे शिक्षणक्रम सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेने विद्याशाखेला सदर शिक्षणक्रम तत्वत: सुरु करणेसंबधी मान्यता देऊन हा विषय विद्वत परिषदेकडे मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे घोषित करण्यात आले.

डॉ. कविता साळूंके
सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

प्र.संचालक
अध्यक्ष, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

School of Education Y.C.M.O.U., Nashik